महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
# राज्य पारेषण उपक्रम (एस.टी.यू.)

''प्रकाशगंगा'' चौथा मजला, सी- १९, ई- ब्लॉक, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पू), मुंबई- ४०००५१.
संकेतस्थळ : www.mahatransco.in

## जाहिर (नोटीस/सूचना)

**सन्माननीय महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाच्या नियम २०२४ च्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्य पारेषण उपक्रम (एस.टी.यू.) यांनी वित्तीय वर्ष २०२५-२६ ते वित्तीय वर्ष २०२९-३० या पाचव्या नियंत्रण मुदतीसाठी वार्षिक स्थिर आकार व राज्य पारेषण शुल्क व आकार मागणी पत्र / विनंती अर्ज सन्माननीय महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाकडे २०२४ चे प्रकरण क्र. १८३ अन्वये सादर केला आहे.**

सदर मागणीपत्र/ विनंती अर्जावर सूचना/हरकती मागविण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, राज्य पारेषण उपक्रम (एस.टी.यू.) यांनी माननिय महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाकडे बहुवार्षिय दर (Multi Year Tariff) नियम २०२४ नुसार वित्तीय वर्ष २०२५-२६ ते वित्तीय वर्ष २०२९-३० या पाचव्या नियंत्रण मुदतीकरीता वार्षिक स्थिर दर / आकार (ए.एफ.सी.) आणि राज्य पारेषण उपक्रम शुल्क व आकार (ए.एफ.सी.) यांच्या मंजुरीसाठी विनंती अर्ज सादर केला आहे.

२. सन्माननीय महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाने सदर विनंती अर्ज **दि. ०४ डिसेंबर २०२४** रोजी दाखल करुन घेतला असून राज्य पारेषण उपक्रम यांना आदेश दिला आहे की, विद्युत अधिनियम (Electricity Act, 2003) चे कलम ६४ (२) नुसार सदर विनंती अर्जावर जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी दैनिक वर्तमानपत्रात सूचना/ जाहिरात (नोटीस) प्रसिध्द करावी. त्या अनुषंगाने सूचना/जाहिरात प्रकाशित करण्यात येत आहे.

३. या विनंती अर्जातील ठळक वैशिष्ठ खालील तक्त्यामध्ये दर्शविलेली आहेत.

**तक्ता क्रमांक १.**

**वित्तीय वर्ष २०२५-२६ ते २०२९-३० या मुदतीसाठी राज्य पारेषण उपक्रम यांचे वार्षिक स्थिर दर यांचा सारांश (AFC).** (रु. लाखात)

| अनु. क्र. | तपशील | वित्तीय वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२५-२६ | २०२६-२७ | २०२७-२८ | २०२८-२९ | २०२९-३० |
| | | प्रक्षेपित | प्रक्षेपित | प्रक्षेपित | प्रक्षेपित | प्रक्षेपित |
| १ | संचलन (प्रवर्तन) व सुव्यवस्था देखभालसाठी खर्च | १,३१०.५८ | १,३९५.४४ | १,४६०.७७ | १,५२९.१६ | १,६००.७४ |
| २ | घसारा खर्च | ५३.८५ | ५८.६१ | ६४.९६ | ७९.२५ | ७७.७५ |
| ३ | भांडवली कर्जाचे व्याज | ४.०२ | ६.२९ | २.८० | ०.५३ | - |
| ४ | खेळत्या भांडवलावरील व्याज | १९.३६ | २०.४९ | २१.०९ | २१.८१ | २२.३४ |
| ५ | एकूण महसूली खर्च | १,३८७.८१ | १,४८०.८३ | १,५४९.६२ | १,६३०.७४ | १,७००.८३ |
| ६ | समभाग भांडवलाचा परतावा | ४.२० | ९.०२ | १०.४९ | १३.२२ | १५.११ |
| ७ | कामगीरीशी संलग्न प्रोत्साहन - अभिदान | २६.२२ | २७.५६ | २७.८९ | २८.४४ | २८.४३ |
| ८ | राज्य पारेषण उपक्रमाचा एकूण खर्च | ३०.४२ | ३६.५८ | ३८.३८ | ४१.६६ | ४३.५४ |
| ९ | वजा: वीजदरा व्यतिरीक्त उत्पन्न | ०.३१ | ०.३२ | ०.३४ | ०.३५ | ०.३७ |
| १० | वजा: मुक्त प्रवेश आकारासाठीच्या अर्जापासून उत्पन्न जनरल नेटवर्क ॲक्सेस. | ५४३.९१ | ५९८.३१ | ६५८.१४ | ७२३.९५ | ७९६.३४ |
| ११ | राज्य पारेषण उपक्रमसाठी वार्षिक स्थिर दर (AFCs). | ८७४.०१ | ९१८.७८ | ९२९.५२ | ९४८.१० | ९४७.६६ |

**तक्ता क्रमांक २.**

**वित्तीय वर्ष २०२५-२६ ते २०२९-३० या मुदतीत प्रस्तावीत राज्य पारेषण उपक्रमाची विभागणी (आंशिक खुला प्रवेश मागणी समाविष्ट).** (रु. लाखात)

| अनु. क्र. | तपशील | वित्तीय वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२५-२६ | २०२६-२७ | २०२७-२८ | २०२८-२९ | २०२९-३० |
| | | प्रक्षेपित | प्रक्षेपित | प्रक्षेपित | प्रक्षेपित | प्रक्षेपित |
| १ | महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी मर्यादित (MSEDCL) | ७४१.९१ | ७८१.८५ | ७९२.८६ | ८१०.५५ | ८११.९४ |
| २ | टाटा पॉवर कंपनी मर्यादित –वितरण (TPC-D) | २९.८१ | ३१.६० | ३२.२३ | ३३.१४ | ३३.४० |
| ३ | अदानी इलेक्ट्रीसीटी मुंबई मर्यादित (AEML-D) | ५४.२० | ५६.३७ | ५६.४२ | ५६.९२ | ५६.२७ |
| ४ | दि बृहन्मुंबई इलेक्ट्रीक सप्लाय आणि ट्रान्सपोर्ट बेस्ट (BEST) | २६.५९ | २६.५९ | २५.५९ | २४.८३ | २३.६० |
| ५ | इंडीयन रेल्वेज (आय. आर.) (मुंबई व उर्वरित महाराष्ट्र संयुक्तरित्या) | १६.५९ | १७.३६ | १७.४८ | १७.७५ | १७.६५ |
| ६ | माईंडस्पसे बिझनेस पार्क प्रा.लि. (MBBPL) | ०.३१ | ०.३१ | ०.३१ | ०.३० | ०.२९ |
| ७ | गिगास्पेस इस्टेट प्रा.लि. (GEPL) | ०.१६ | ०.१६ | ०.१६ | ०.१६ | ०.१५ |
| ८ | के. आर. सी. इन्फ्रास्ट्रकचर आणि प्राजेक्ट्स प्रा.लि. (KRCIPPL) | ०.१७ | ०.१७ | ०.१७ | ०.१७ | ०.१६ |
| ९ | निडर युटीलीटीज, पनवेल (एल.एल.पी.) | ०.२५ | ०.३० | ०.३४ | ०.३९ | ०.४३ |
| १० | महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी (एम.ए.डी.सी.) | ०.४५ | ०.४८ | ०.४९ | ०.५१ | ०.५२ |
| ११ | इ. ओ. एन. फेज – १ | ०.२७ | ०.२६ | ०.२५ | ०.२४ | ०.२३ |
| १२ | इ. ओ. एन. फेज – २ | ०.१८ | ०.१८ | ०.१७ | ०.१६ | ०.१५ |
| १३ | जवाहरलाल नेहरु पोर्ट अथॉरिटी (JNPA) | ०.०५ | ०.०६ | ०.०६ | ०.०६ | ०.०७ |
| १४ | लक्ष्मीपती बालाजी सप्लाय चेन मॅनेजमेंट लि. (ए. बी. एस. सी. एम. लि.) | ०.०२ | ०.०२ | ०.०२ | ०.०२ | ०.०२ |
| १५ | अदानी इलेक्ट्रीसीटी (SEEPZ) लि. (AEML) | ०.९१ | ०.९४ | ०.९४ | ०.९४ | ०.९३ |
| १६ | हडपसर सेझ (SEZ) | ०.५० | ०.४९ | ०.४७ | ०.४५ | ०.४३ |
| १७ | मंजिरी सेझ (SEZ) | ०.३५ | ०.३५ | ०.३३ | ०.३२ | ०.३० |
| १८ | महाराष्ट्र इंडस्ट्रिअल टाऊनशिप लि. (MITL) शेंद्रा. | ०.६५ | ०.६५ | ०.६२ | ०.६० | ०.५६ |
| १९ | महाराष्ट्र इंडस्ट्रिअल टाऊनशिप लि. (MITL) बिडकीन. | ०.६५ | ०.६५ | ०.६२ | ०.६० | ०.५६ |
| | **एकूण** | **८७४.०१** | **९१८.७८** | **९२९.५२** | **९४८.१०** | **९४७.६६** |

**तक्ता क्रमांक ३.**

**वित्तीय वर्ष २०२५-२६ ते २०२९-३० साठी प्रस्तावित शुल्क.** (रु.)

| अनु. क्र. | तपशील | प्रस्तावित शुल्क |
|---|---|---|
| १ | नूतनशील ऊर्जा वीज जोडणी शुल्क/दर (RE साठी) | रु. १,००,०००/- |
| २ | नूतनशील ऊर्जा व्यतिरीक्त वीज जोडणी शुल्क/दर (RE व्यतिरीक्त) | रु. २,००,०००/- |
| ३ | मध्यम कालीन मुदतीच्या खुल्या प्रवेशाचा अर्ज शुल्क (MTOA) | रु. १,००,०००/- |
| ४ | दिर्घकालीन मुदतीच्या खुल्या प्रवेशाचा अर्ज शुल्क (LTOA) | रु. २,००,०००/- |
| ५ | अतिरीक्त उच्च व्होल्टेज अर्ज शुल्क | रु. २,००,०००/- |
| ६ | सौर, पवन, संकरीत (SWH) अर्ज | रु. १,००,०००/- |
| ७ | सहनिर्मिती (Co-generation) अर्ज. | रु. १,००,०००/- |

** उपरोक्त प्रस्तावित शुल्क महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाचे पारेषण मुक्त प्रवेश नियमन, २०१६ च्या नियमन ५.२ नुसार नुतनशील ऊर्जा (सौर, पवन, संकरीत, सहनिर्मिती ऊर्जा इ.) आणि नूतनशील ऊर्जा व्यतिरीक्त वीज जोडणी अर्ज शुल्क प्रकाशित केले आहे. मध्यम कालीन / दिर्घकालीन मुदतीच्या आणि अतिरीक्त उच्च व्होल्टेज अर्ज शुल्क महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाचे दिनांक २३.०९.२०१५ च्या पत्राद्वारे मंजूर केलेल्या प्रक्रियेनुसार आहे. वरील शुल्क चौथ्या नियंत्रण कालावधीसाठी लागू आहे आणि राज्य पारेषण उपक्रमाने पाचव्या नियंत्रण कालावधीसाठी (वित्तीय वर्ष २०२५-२६ ते २०२९-३०) प्रस्तावित केले आहे.

४. वरील विनंती अर्जाची तपशीलवार कागदपत्रे आणि कार्यकारी सारांश माहिती महापारेषण कंपनीच्या संकेत स्थळावर (www.mahatransco.in) येथे तसेच माननीय महाराष्ट्र राज्य नियामक आयोग यांचे संकेतस्थळ www.merc.gov.in येथे सुध्दा उपलब्ध आहे. (ती माहिती विनामुल्य आहे.)

५. या संबंधीच्या खालील कागदपत्रांच्या प्रती महाराष्ट्र राज्य पारेषण उपक्रम यांच्या कार्यालयात लेखी केल्यास मिळू शकतील.

अ) प्रस्तावाचा कार्यकारी सारांश: (विनामूल्य मराठी व इंग्रजी भाषेत)

ब) अर्जाचे तपशीलवार कागदपत्रे आणि त्यासोबत सी.डी. (CD) इंग्रजी भाषेत रोख किंवा मागणी धनाकर्षणने (डी.डी.) रुपये १००/- भरल्यास मिळेल. मागणी धनाकर्षण **महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित** यांच्या नावाचा मुंबई देय असावा.

क) अर्जाची तपशीलवार कागदपत्रे (इंग्रजी मध्ये) रु. ५०/- भरल्यास.

ड) अर्जाची तपशीलवार कागदपत्रे (इंग्रजी मध्ये) सी.डी. रु. ५०/- भरल्यास.

| कार्यालय | पत्ता | दूरध्वनी | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|
| मुख्य अभियंता (राज्य पारेषण उपक्रम) | ''प्रकाशगंगा'' चौथा मजला, ए विंग सी- १९, ई- ब्लॉक, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पू), मुंबई- ४०००५१. | ०२२६९५९५१७६ | cestu@mahatransco.in |

६. माननीय महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाने महाराष्ट्र राज्य पारेषण उपक्रम (एस.टी.यू.) यांना आदेश/निर्देश दिले आहेत की, त्यांनी त्यांच्या विनंती अर्जावर जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी दैनिक वर्तमान पत्रामध्ये जाहीर सूचना/ नोटीस प्रकशीत करावी. प्रकाशीत झालेल्या सूचनेला प्रतिसाद देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने त्यांच्या सूचना/हरकती इंग्रजी किंवा मराठी भाषेत, लेखी स्वरुपात माननीय महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाच्या संकेत स्थळावर म्हणजेच www.merc.gov.in यावर "E-public consultation" वर अपलोड कराव्यात.

याबाबत हरकती/ सूचना अपलोड करत असताना तक्रारदारास काही अडचणी आल्यास त्यांना सन्माननीय महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाच्या कार्यालयाशी भ्रमणध्वनी क्र. ८९२८०७१५२२ सकाळी १०.०० पासून सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत संपर्क करावा. किंवा ई-मेल आयडी suggestion.merc.gov.in येथे मेल करावा.

७. ज्या व्यक्तीने (E-Public Consultation) ई-सार्वजनिक सल्लामसलत टॅबवर सूचना आणि आक्षेप अपलोड केले आहेत, त्यांना त्यांच्या कागदपत्रांची परिपूर्तता करणे आवश्यक नाही. ज्या व्यक्तींकडे इलेक्ट्रानिक माध्यमांचा उपलब्धता नाही, ते त्यांच्या सूचना आणि आक्षेपांची कागदत्रे महाराष्ट्र राज्य पारेषण उपक्रम, मुख्य अभियंता, राज्य पारेषण उपक्रम (एस.टी.यू.), चौथा मजला, प्रकाशगंगा, सी- १९, ई- ब्लॉक, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पू), मुंबई- ४०००५१, भारत दूरध्वनी क्र. ०२२६९५९५१७६, ई-मेल: cestu@mahatransco.in या केंद्रावरील सेवेच्या पुराव्यासहीत मा. सचिव, महाराष्ट्र राज्य विद्यूत नियामक आयोग (MERC) १३ वा मजला, केंद्र क्रमांक १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई- ४००००५ यांना संबोधित करावे व संबंधिताचे पूर्ण नाव, टपाल पत्ता व ई-मेल पत्ता सदर आक्षेप/सूचना कागदपत्रावर असणे आवश्यक आहे. **३१ डिसेंबर, २०२४** रोजी संध्याकाळी ५ नंतर प्राप्त झालेल्या सूचना/ आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. इतर कोणत्याही माध्यमातून दाखल केलेल्या सूचना/ आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

८. राज्य पारेषण उपक्रम **३१ डिसेंबर, २०२४** पर्यंत प्राप्त झालेल्या प्रत्येक सूचनेस किंवा आक्षेपास प्राप्त झाल्यापासून तीन दिवसाच्या आत म्हणजे **०३ जानेवारी, २०२५** पर्यंत उत्तर देईल. परंतु **३१ डिसेंबर, २०२४** नंतर प्रस्तुत केलेले सूचना/ आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. राज्य पारेषणने दिलेल्या उत्तरास हितसंबंधीत ई- सार्वजनिक सुनावणीमध्ये मधे किंवा **१० जानेवारी, २०२५** पर्यंत प्रतिवाद सादर करुन शकतो.

९. **०७ जानेवारी, २०२५** रोजी सकाळी १०:३० वाजता व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे ज्या प्रेषकाने/ आक्षेपकत्याने वरील परिच्छेद ६ नुसार आपल्या टिपण्या/सूचना सादर केल्या आहेत आणि ई-सार्वजनिक सुनावणीदरम्यान आपले म्हणणे ऐकून घ्यायचे असेल, तर त्याने/तिने सूचना/आक्षेप दाखल करताना त्याचा विशेष उल्लेख करावा. अशा परिस्थितीत वैध ई-मेल आयडी आणि भ्रमणध्वनी क्रमांक सादर करणे अनिवार्य असेल. मा. आयोगाच्या स्वत:च्या विवेकबुध्दीनुसार, अशा प्रेषक / आक्षेपकर्त्याला आयोजित करण्यात येणाऱ्या ई-सार्वजनिक सुनावणीमध्ये ऐकण्याची परवानगी देऊ शकते. यासाठी कोणतीही वेगळी सूचना दिली जाणार नाही.

१०. ई-सार्वजनिक सुनावणीला उपस्थित असलेल्या सर्व सहभागींनी आयोगाने १४ नोव्हेंबर २०२२ रोजी जारी केलेल्या ''आयोगासमोर याचिकेच्या ई-सार्वजनिक सुनावणीसाठी पाळल्या जाणाऱ्या परिचालन प्रक्रिया आणि प्रोटोकॉल'' वरील सराव निर्देशांचे पालन करावे.

**सही:**

**ठिकाण:** मुंबई
**दिनांक:** १० डिसेंबर, २०२४

**नाव:** पीयुष शर्मा
**हुद्दा:** मुख्य अभियंता